महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६
च्या कलम ४४ अन्वये कोळसा भट्टया
लावण्यासाठी बिनशेती वापराच्या
परवानगी बाबत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. अेनअेपी १०८७/१६२०३/सीआर ११२८/ल-२
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक- १९ फेब्रुवारी, १९९२

वाचा: शासन निर्णय आदेश क्र. सम दिनांक ११ मे, १९८७

शासन निर्णय:

शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. अेनएपी १०८७/१६२०३/सीआर ११२८-ल-२, दिनांक ११ मे १९८७ च्या आदेशानुसार अवैध वृक्षतोडीला आवर घालण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत कोळसा भट्टयांसाठी जमिनीचा तात्पूरता अकृषिक वापर करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ खालील परवानगी देण्यात येवू नये असे आदेश देण्यात आले होते.

२. उपरोक्त आदेशाचे पुनरिक्षण करुन समक्रमांकाचे दि. ११ मे १९८७ चे आदेश आता रद्द करण्यात येत असून त्याऐवजी पुढील सुधारीत आदेश शासन देत आहे. कोळसा भट्टयांसाठी अकृषिक परवानगी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४४ व महाराष्ट्र जमीन महसूल[ जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी] नियम, १९६९ च्या तरतूदींना अधिन राहून खालील अटींवर देण्यात यावी :-

१] कोळसा भट्टयांसाठी वन खात्याचे " ना हरकत प्रमाणपत्र" घेण्यात यावे.

२] कोळसा भट्टयांची जागा संरक्षित वा राखीव वनाच्या हद्दीपासून किमान १० कि.मी. अंतरावर असावी.

३] कोळशाची वहातूक पावसाळ्यात करण्यात येवू नये.

४] अकृषिक परवान्याचा काळ एक वर्षासाठीच मर्यादित ठेवावा.

५] आरा गिरण्यांप्रमाणेच कोळसा भट्टयांसाठी वन विभागाचा परवाना घेण्यात यावा.

६] जमीन मालकांनी जितकी झाडे तोडण्यात आली असतील त्याच्या दुप्पट रोपे लावली पाहिजेत.

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी.
25 FEB 1992
महसूल

LNA
२०/२
सत्वर

कृ. मा. प.

[७] कोळसा भट्टयांची जागा पर्यावरणाच्या दृष्टीने जो परिसर संवेदनाशिल वा अतिसंवेदनशिल असेल अशा ठिकाणापासून किमान २५ कि.मी. अंतरावर असणे आवश्यक आहे.

अकृषिक परवानगी देताना जंगलावर अनिष्ट परिणाम होणार नाही याची वनसंरक्षक/जिल्हाधिकारी यांनी वन खात्याच्या सल्ल्याने उचित कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भा. सु. तायडे

[ भा. सु. तायडे ]
अतिरिक्त कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग,

प्रत:-